# महात्मा फुले कृषि विद्यापीठ जाहिर निवेदन
## पदवीप्रदान समारंभ

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा ३९ वा पदवीप्रदान समारंभ रविवार, दिनांक १५ मार्च, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता मध्यवर्ती परिसर, राहुरी येथे आयोजित केला आहे. ज्या स्नातकांनी पदवी व्यक्तीशः घेण्यासाठी विहीत तारखेच्या आत अर्ज केलेले आहेत, अशा स्नातकांनी दिनांक १४ मार्च, २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता विद्यापीठ ग्रंथालय जवळ असलेल्या परीक्षा सभागृहामध्ये विद्यावस्त्रे स्विकारण्यासाठी उपस्थित रहावे. स्नातकांना विद्यावस्त्रांसाठी रु.२००/-अनामत रक्कम जमा करावी लागेल.

स्नातकांनी समारंभाच्या रंगीत तालमीसाठी शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये उपस्थित रहावे, तसेच रविवार, दिनांक १५ मार्च, २०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता विद्यावस्त्र परिधान करुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये हजर रहावे. उशीरा आलेल्या स्नातकांना पदवीप्रदान समारंभात भाग घेता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

जा.क्र. विद्या- १०/६२५ /२०२६
दिनांक.०३/०२ /२०२६

राजेंद्रकुमार पाटील
कुलसचिव